# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे

फोन नंबर ०२२ - २९४५१००१

**Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट ९५/२०२५ दिनांक - २६/०२/२०२५

## प्रेस नोट

**३.५ लाखाहुन अधिक लोकांचा डाटा हॅक व डाटा डिलीट करुन फिर्यादीचे एक करोड ५१ लाखाचे नुकसान करणा-या सायबर चोरटयांना पकडण्यात नयानगर पोलीस ठाण्यास यश**

--------------

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नयानगर पोलीस स्टेशन परीसरात राहणा-या राज रामप्रसाद सिंग, वय-३६ वर्षे, यांचे पुनॉन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमीटेड व ॲब्सोल्युट सॉफ्ट सीस्टीम प्रायव्हेट लिमीटेड या कंपनीच्या मालकीचे “ मॅजिक लॉकर ” नावाच्या सॉप्टवेअरचे मुळ सोर्स कोडमध्ये हेराफेरी करुन व मॅजिक लॉकरच्या सर्वरमध्ये अनाधिकृतपणे ॲक्सेस मिळवून ३.५ लाख अधिक ग्राहकांचा डाटा हार्ड रिसेट (फॉरमेट) केला, त्यामुळे फिर्यादीयांना १ करोड ५१ लाख रुपयांची नुकसान भरपाई ग्राहकांना देण्यात आली. सदरबाबत फिर्यादीचे तक्रारीवरुन नयानगर पोलीस ठाणे गु.रजि.क्रं I ४९०/ २०२४ भारतीय दंड सहित कलम ४२०,३४ सह माहीती तत्रज्ञान अधिनियम २००० कलम ४३, ६६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

नमुद तक्रार दाखल झालेनंतर गुन्हयाचा तांत्रिक तपासकरुन वाराणसी, राज्य उत्तरप्रदेश येथून आरोपीत नामे १) मनोजकुमार छोटेलाल मौर्या,२) हिमांशू अशोक सिंग यांना व विरार येथून आरोपीत नामे ३) चंद्रेश लालजी भारतीया यांना अटक करण्यात आली आहे. त्यांचेकडून तीन लॅपटॉप/ तीन मोबाईल ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीत यांना मा.न्यायालयात हजर करुन तपासकामी पोलीस कस्टडी घेण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा.पोलीस आयुक्त श्री.मधूकर पांडेय, मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री.दत्तात्रय शिंदे साहेब. श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०१, मिरारोड, श्री. विवेक मुगळीकर, सहा.पोलीस आयुक्त, नवघर विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक /श्री अमर जगदाळे, नयानगर पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/श्री. अशोक उगले व त्यांचे पथकातील सपोनि/सुधीर थोरात, सपोनि/पराग भाट, सफौ/राजेश काळकुंड, पोहवा/प्रमोद केंद्रे, पोहवा/महेश खामगळ, पोअं/ लालाजी लटके, पोअं/रहमत पठाण तसेच सायबर तज्ञ श्री. पुष्कर झांन्टेय, समीर बयाणी यांनी केला आहे.

-----------oo---------------